कर्मचारी वर्ग शाखा
परिपत्रक क्र. १२/१९९५.

क्र. राप/आस्था/४८५-ई/३७०५
म.रा.मा.प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई - ४०० ००८. दिनांक : ५.७.१९९५.

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा.प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

व्यवस्थापक (प्रशिक्षण),
रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

विभाग नियंत्रक,
रा.प. भांडार विभाग, कुर्ला, मुंबई/मुंबई/धुळे/जळगांव/नाशिक/पालघर/
रायगड (पेण)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/पुणे/अहमदनगर/कोल्हापूर/
सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/
उस्मानाबाद/परभणी/नागपूर/अकोला/अमरावती/भंडारा/बुलढाणा/
चंद्रपूर/वर्धा/यवतमाळ.

विषय : अनुकंपा तत्वावरील मंजूर केलेली प्रकरणे विचारात
घेऊन नोकरी देण्याबाबत.

...

अनुकंपा तत्वावर पूर्वी प्रसारित केलेले परिपत्रक क्र. राप/आस्था/४८५-ई/९८११, दिनांक १०.१२.१९७२ नुसार मयत कर्मचारी ज्या विभागामध्ये कार्यरत होता, सामान्यत: त्याच विभागामध्ये त्याच्या अवलंबिताचा अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी विचार करावा अशा सूचना दिलेल्या आहेत. परंतु काही विभागामध्ये रिक्त जागे अभावी अनुकंपा तत्वावरील नेमणुका देण्या विषयीची कार्यवाही होऊ शकली नाही की, ज्यामुळे अवलंबीत अनुकंपा तत्वावरील प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्यांनी मंजूरी देऊनही नोकरीपासून वंचित राहीले असल्याचे निदर्शनास आलेले आहे. मयत कर्मचाऱ्याच्या अवलंबितास तातडीने नोकरी देऊन त्यांच्या कुटुंबियाचे तातडीने पुनर्वसन करण्याचा हेतू साध्य होण्यास अडचण निर्माण झाली आहे. ही बाब संचालक मंडळाने दिनांक १९.४.१९९५ रोजी झालेल्या बैठकीत चर्चेस घेतली व पूर्वीच्या सूचनांमध्ये बदल करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादीत केले. त्याविषयी या विषयावर साधकबाधक चर्चा होऊन संचालक मंडळाने ठराव क्रमांक ९५:०४:०५, दिनांक १९.४.१९९५ नुसार असा निर्णय घेतलेला आहे की, "अनुकंपा तत्वावरील उमेदवारांना महामंडळाच्या सेवेमध्ये सामावून घेतांना त्यांनी ज्या ठिकाणी अर्ज केला असेल त्या ठिकाणी रिक्त पदे नसल्यास त्यांची तयारी असेल तर दुसऱ्या विभागात रिक्त पद उपलब्ध असल्यास प्रादेशिक व्यवस्थापक यांचे सहमतीने त्यांना त्या ठिकाणी नेमणूक देण्यास हरकत नाही."

..२..